आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १. ३० वाजता

९ सप्टेंबर २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, आणि  अबुधाबीचे युवराज शेख खालेद बीन मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांच्यात आज शिष्टमंडळ स्तरावर चर्चा

- वस्तू आणि सेवा कर म्हणजे जीएसटी परिषदेची चोपन्नावी बैठक केंद्रीय अर्थमंत्र्यांच्या  अध्यक्षतेखाली सुरु

- कोलकात्याच्या राधागोविंद कार रुग्णालयातल्या डॉक्टरांनी संप मागे घ्यावा आणि रुग्णालयाने त्यांच्यावर कारवाई करु नये अशी सर्वोच्च न्यायालयाची सूचना

- गणेशोत्सवाचा उत्साह देशाच्या कानाकोपऱ्यात

**आणि**

- बांगलादेशविरुद्धच्या दोन क्रिकेट कसोटी सामन्यांच्या मालिकेद्वारे ऋषभ पंतचं भारतीय संघात पुनरागमन

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची अबुधाबीचे युवराज शेख खालेद बीन मोहम्मद बिन झायेद अल नाहयान यांच्याशी आज शिष्टमंडळ स्तरावर चर्चा सुरू आहे. भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यातल्या द्विपक्षीय सहकार्याबाबत विस्तृत चर्चा या भेटीत होत आहे. युवराज नाहयान आज नवी दिल्लीत राजघाटावर जाऊन महात्मा गांधींच्या स्मृतीस्थळाचं दर्शन घेतील तसंच ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही भेट घेणार आहेत.

युवराज नाहयान उद्या मुंबईत बिझनेस फोरममध्ये उपस्थित राहणार असून या फोरममध्ये दोन्ही देशांचे उद्योजक आणि व्यवसायिक सहभागी होणार आहेत. भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यात ऐतिसाहिक मैत्रीपूर्ण संबंध असून गेल्या काही वर्षात शिक्षण, तंत्रज्ञान, गुंतवणूक, व्यापार, राजकारण अशा अनेक क्षेत्रात दोन्ही देशांमध्ये सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी अधिक व्यापक झाली आहे.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कर म्हणजे जीएसटी परिषदेची चोपन्नावी बैठक आज नवी दिल्लीत केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली होत आहे. केंद्रीय अर्थराज्यमंत्री पंकज चौधरी आणि सर्व राज्यांचे अर्थमंत्री बैठकीला उपस्थित आहेत. गेल्या जून महिन्यात झालेल्या जीएसटी परिषदेच्या बैठकीत लोखंड, पोलाद आणि ॲल्युमिनियमच्या दुधाच्या कॅनवर बारा टक्के समान जीएसटी दर लागू करण्याची शिफारस करण्यात आली होती. भारतीय रेल्वेकडून सर्वसामान्य जनतेल्या पुरवल्या जाणाऱ्या प्लॅटफॉर्म तिकिटं, विश्रामगृह, प्रतीक्षालयं, बॅटरी-संचलित कार सेवा अशा सेवांवर जीएसटी लागू केला जाऊ नये, अशीही शिफारस या परिषदेनं केली होती.

**<><><><><>**

संरक्षण विभागानं आजपासून दिल्लीत तीन सेवांमधील अधिकाऱ्यांसाठी पहिला संयुक्त आढावा मूल्यांकन कार्यक्रम आयोजित केला आहे. संरक्षण मंत्रालय, परराष्ट्र व्यवहार मंत्रालय आणि गृह मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांसह तिन्ही दलांचे मेजर जनरल आणि समकक्ष अधिकाऱ्यांसाठी हा पाच दिवसीय कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. या कार्यक्रमात धोरणात्मक नियोजन, भविष्यातले धोके, आव्हानं

आणि संघर्षांसाठी योग्य अंदाज आणि तयारी यांचा समावेश असेल. विविध विभागांमधे समन्वय आणि एकात्मता वाढवणं हे या कार्यक्रमाचं उद्दिष्ट आहे.

**<><><><>**

केंद्रीय सामाजिक न्याय मंत्रालयानं आजपासून उत्तर प्रदेशातल्या आग्रा इथं दोन दिवसीय राष्ट्रीय आढावा परिषद आयोजित केली  आहे. चिंतन शिबिर नावाच्या या परिषदेत देशातली  सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधील सामाजिक न्याय आणि समाजकल्याण विभागांचे मंत्री आणि वरिष्ठ अधिकारी सहभागी  होणार  आहेत. केंद्रीय सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्री डॉक्टर वीरेंद्र कुमार यांच्यासह केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री बी.एल. वर्मा आणि रामदास आठवले यांच्या अध्यक्षतेखाली या शिबिराचं उद्घाटन  करण्यात  येईल.

**<><><><>**

कोलकात्याच्या आर. जी. कर वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील प्रशिक्षणार्थी डॉक्टरवर झालेला बलात्कार आणि हत्या प्रकरणी सुरू असलेल्या तपासाचा  ताजा अहवाल पुढच्या मंगळवारपर्यंत सादर करावा, अशा सूचना सर्वोच्च न्यायालयानं आज सीबीआयला दिल्या. सर्वोच्च न्यायालयानं याप्रकरणी स्वतःहून दाखल करून घेतलेल्या याचिकेची सुनावणी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्यायाधीश जे बी पारडीवाला आणि  मनोज मिश्र यांच्या खंडपीठासमोर होत आहे.

सीबीआयतर्फे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता तर पश्चिम बंगाल सरकारकडून ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल बाजू मांडत आहेत. दरम्यान, निवासी डॉक्टरांनी पुकारलेला संप मागे घेऊन उद्या संध्याकाळी पाच वाजेपर्यंत कामावर हजर व्हावं असं सर्वोच्च न्यायालयानं आज सांगितलं. या संपात सहभागी झालेल्या

डॉक्टरांवर कोणतीही कायदेशीर कारवाई केली जाणार नाही, असा दिलासा सर्वोच्च न्यायालयानं दिला आहे. डॉक्टरांच्या सुरक्षेसाठी राज्य सरकारनं आवश्यक ती सर्व खबरदारी घेण्याच्या सूचना ही सर्वोच्च न्यायालयानं पश्चिम बंगाल सरकारला दिल्या आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या २९ सप्टेंबरला आकाशवाणीवरुन मन की बात कार्यक्रमाद्वारे देश-विदेशातल्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमाचा हा ११४ वा भाग असेल.

या कार्यक्रमासाठी आपल्या कल्पना आणि सूचना १८००-११-७८०० या टोल फ्री क्रमांकावर २७ सप्टेंबरपर्यंत देता येतील. तसंच माय जीओव्ही संकेतस्थळावरून देखील सूचना पाठवता येतील. हा कार्यक्रम २९ सप्टेंबरला सकाळी ११ वाजता आकाशवाणी आणि दूरदर्शनवरुन प्रसारित करण्यात येईल.

**<><><><><>**

देशात सर्वत्र गणेशोत्सवाचा उत्साह बघायला मिळत आहे. मुंबईतल्या गणेशोत्सवाबद्दल अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**व्हॉईस कास्ट- अंकिता आपटे**

महाराष्ट्राबाहेरही गणेशोत्सव उत्साहाने साजरा होतो. उत्तर प्रदेशातल्या कानपूर इथं महाराष्ट्र मंडळाकडून गणेशोत्सव साजरा केला जात आहे. शंभर वर्षांची परंपरा असलेलं हे मंडळ मराठी पद्धतीनं गणपतीची पूजा अर्चना करतं. कानपूरमधले अनेक मराठी कुटुंबं या उत्सवात भक्ती भावानं सहभागी होतात. १९१९ साली महाराष्ट्र मंडळानं गणेशोत्सव साजरा करायला सुरुवात केली होती.

श्रोते हो, पुण्यातून सुरू झालेला सार्वजनिक गणेशोत्सव आता आंतरराष्ट्रीय झाला आहे. विविध देशात गणेशोत्सव कशा रीतीने साजरा होतो हे आपण तिथे राहणाऱ्या नागरिकांकडून जाणून घेणार आहोत. आकाशवाणी मुंबईवरून रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय बातम्यांमध्ये, दररोज. तेव्हा ऐकायला विसरू नका, आंतरराष्ट्रीय गणेशोत्सव आकाशवाणीवर.

**<><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मुंबई दौऱ्याच्या आजच्या दुसऱ्या दिवशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या तसंच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस निवासस्थानी जाऊन गणपतीचं दर्शन घेतलं. मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आमदार आशीष शेलार, भाजपा नेते रावसाहेब दानवे आणि इतर यावेळी उपस्थित होते. त्यानंतर शहा यांनी मुंबईच्या प्रसिद्ध लालबागच्या राजाचं दर्शन घेतलं. तसंच वांद्रे पश्चिम इथल्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या गणरायाचं दर्शन घेऊन पूजा केली.

गृहमंत्री शहा यांनी काल मुंबई समाचार या वर्तमानपत्राच्या द्विशताब्दीनिमित्त तयार केलेल्या लघुपटाचं प्रकाशन केलं.

**<><><><>**

बांगलादेशविरुद्धच्या दोन क्रिकेट कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी भारताच्या खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. चेन्नईतल्या एमए चिदंबरम मैदानावर १९ तारखेपासून ही मालिका सुरू होणार आहे. के. एल राहुल आणि ऋषभ पंत यांचं संघात पुनरागमन झालं आहे, तर यश दयाल पहिल्यांदाच खेळणार आहे. ऋषभ पंत डिसेंबर २०२२ नंतर पहिल्यांदाच भारताच्या संघात खेळणार आहे. रोहित शर्मा संघाचं नेतृत्व करणार आहे.

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १. ३० वाजता

९ सप्टेंबर २०२४ - सोमवार

**<><><><><>**

हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने ९ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. त्यात माजी खासदार बृजेंद्रसिंग यांना उचनाकलान मतदारसंघातून तर मोहित ग्रोवर यांना गुरुग्राममधून उमेदवारी देण्यात आली आहे. ९० जागांपैकी ३२ ठिकाणचे उमेदवार काँग्रेसने जाहीर केले आहेत. हरियाणा विधानसभेसाठी एकाच टप्प्यात येत्या ५ ऑक्टोबरला मतदान होणार आहे.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरच्या राजौरी जिल्ह्यात नियंत्रण रेषेवरून घुसखोरी करण्याचा प्रयत्न भारतीय जवानांनी हाणून पाडला. नौशेराच्या लाम परिसरात काही संशयास्पद हालचाली नजरेस आल्यावर भारतीय लष्करानं काल रात्री ऑपरेशन कांची ही शोधमोहीम सुरु केली.

**<><><><><>**

जागतिक संकटांना तोंड देण्यासाठी आणि माध्यमांवरचा विश्वास वाढवण्यासाठी बौद्ध शिकवणीचा वापर व्हावा या उद्देशानं येत्या ११ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत आंतरराष्ट्रीय बौद्ध मीडिया कॉनक्लेव्ह आयोजित करण्यात आली आहे. संघर्ष टाळून शाश्वत विकासासाठी संवाद साधणं ही या बैठकीमागची संकल्पना आहे.

**//<><><><><>//**